ब) प्रवेश शुल्कापोटी रु.१००/- अथवा संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल तितक्या रक्कमेचा भरणा केला असेल व किमान शंभर भागांची मागणी केली असेल.

क) कायदा, नियम व बँकेचे पोटनियम यानुसार सर्व अटींची पुर्तता केली असेल.

२) मा.संचालक मंडळ सभेमध्ये त्याचा अर्ज मंजूर होवून त्यास सभासद म्हणून स्विकारण्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

३) जर कोणत्याही व्यक्तीने खालील अटींची पूर्तता केली नसेल तर ती व्यक्ती सभासद म्हणून स्विकारण्यास अपात्र होईल.

अ) वयाची १८ वर्षे पूर्ण केली नसतील अशी व्यक्ती.

ब) अधिकृत न्यायालयाने दिवाळखोर अथवा दोषमुक्त न केलेला दिवाळखोर ठरविले असेल अशी व्यक्ती.

क) कोणत्याही गुन्ह्यासाठी शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती. अशा गुन्ह्यामध्ये राजकीय स्वरुपाचे अथवा चारित्र्यहननाचे अथवा अप्रामाणिकपणाचे गुन्हे सोडून इतर गुन्ह्यांचा समावेश असेल आणि शिक्षा होवून ५ वर्षाचा कालावधी लोटला नसेल अशा व्यक्तींचा समावेश होणार नाही.

## १२) सभासदाचे हक्क व अधिकार :

प्रत्येक सामान्य सभासदांना पुढील हक्क प्राप्त होतील.

१) सभासदास कायदा, नियम व पोटनियम यानुसार लागू असलेले सर्व हक्क राहतील. परंतु जोपर्यंत सभासद कायदा, नियम व पोटनियम यानुसार आवश्यक तेवढे भाग खरेदी करत नाही किंवा त्यासाठी आवश्यक रक्कमेचा भरणा करत नाही तोपर्यंत त्यास सभासदत्वाचे हक्क बजावता येणार नाहीत.

त्याशिवाय बँकेने किमान भाग भांडवलाची मर्यादा वाढविली व त्याप्रमाणे सभासदास मागणी नोटीस पाठवून आवश्यक तेवढा कालावधी दिल्यास सभासदत्वाचे हक्क बजावण्याकारीता त्या रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

२) बँकेच्या सभासदांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे -

अ) अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे.

ब) अगोदरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सेवांचा लाभ किमान एखाद्या वर्षी घेतलेला असावा.